# प्रेस नोट

दि. २६/०७/२०२३

# पनवेल शहर पोलीस ठाणे

## ऑनलाईन फ्रॉडचा गुन्हा उघडकीस अधिक तपास चालु

## पनवेल शहर पोलीस ठाणेची कारवाई

---

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रारदार श्री आकाश अशोक गायकवाड वय ३१ वर्षे यांनी माहीती दिली की, 'दिनांक ०२/०७/२०२३ रोजी ते दि. १८/०७/२०२३ रोजी १८.१५ वा. दरम्यान अनोळखी आरोपीत याने पृथा कुलकर्णी नावाचे फेसबुक अकाऊंटवरुन यातील फिर्यादी यास मेसेज व कॉल करुन तसेच मो.नं. वरुन कॉल करुन शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केल्यास मोठा नफा देवु असे वेळोवेळी सांगुन ३,७१,०००/रु. गुंतविण्यास प्रवृत्त करुन सदरची रक्कम व त्यावरिल नफा यापैकी काहीएक न देता फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे.' सदर प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ४२४/२०२३ भा.द.वि.स कायदा कलम ४२० सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६६(ड) अन्वये दि. १९/०७/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ०२, पनवेल व मा. सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांचे सुचनेनुसार तसेच पनवेल पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (प्रशा) श्री दिलीप शिंदे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पथकाचे अधिकारी सपोनि पालमपल्ले व पोलीस हवा./बारवे, पो.कॉ./मेऱ्या यांनी गुन्हयातील उपलब्ध माहितीचे आधारे तांत्रीक तपास करुन आरोपी निष्पन्न करुन आरोपी नामे अजित दत्तात्रय चव्हाण वय २९ वर्षे रा. कळंबोली, नवी मुंबई यास अटक करुन नमुद गुन्हयाची ४ तासात उकल केली आहे. सदर गुन्हयात अटक आरोपीने गुन्हा करण्यासाठी वापरलेले २ मोबाईल फोन व १ लॅपटॉप असा एकुण ४०,०००/रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच सदर आरोपीने यापूर्वीही इतर ठिकणी अशाप्रकारचे महिलांचे नावाने फेक फेसबुक अकाऊंट बनवुन त्यावर महिलेचा फोटो अपलोड करुन त्याचा वापर करुन खालीलप्रमाणे विविध ठिकाणी आर्थिक फसवणुक केली आहे.

१)कोल्हापुर - २६,००,०००/रु.
२)चिपळुन - १,२५,००००/रु.
३)नागपूर - ३,२५,०००/रु.
४)पुणे - २०,०००/रु.
५)डोंबिवली, कल्याण - ४०,०००/रु.

सदर ठिकाणचे फिर्यादी व संबंधीत पोलीस ठाणेस संपर्क करुन आरोपीचा ताबा घेण्यासाठी पाठपुरावा करीत आहोत.

---